तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित दिवाळीच्या विशेष कार्यक्रमात दीपप्रज्वलित करताना परदेशी विद्यार्थी- विद्यार्थिनी.

# प्र–कुलगुरु डॉ. पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, मिठाई वाटप

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांसाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या अतिथीगृहात प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागात आकर्षक रांगोळी, छोटे–मोठे कंदील लावून सजावट केली. या विद्यार्थ्यांनी परिसरात पणत्या प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा केला.

इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस. बी. सादळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर प्र–कुलगुरु डॉ. पाटील यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्तेही पणत्या प्रज्वलित केल्या. नूतन संचालक डॉ. सादळे यांच्यासह मावळते संचालक डॉ. अनिल घुले यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यापीठातून पीएच. डी. अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल इराकचा विद्यार्थी रियाध राद अब्बॉद अल्बुरी याचा सत्कार केला. त्यानंतर प्र–कुलगुरू डॉ. पाटील यांनी सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते सर्व परदेशी विद्यार्थ्यांना मिठाईवाटप केले. परदेशी विद्यार्थ्यांचे संशोधन मार्गदर्शक, अधिविभागप्रमुख, टास्क फोर्स समिती सदस्य, समन्वयक उपस्थित होते. डॉ. जे. बी. यादव यांनी आभार मानले.

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात परदेशी विद्यार्थ्यांकडून दिवाळी साजरी

कोल्हापूर,ता.२३(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठात प्रवेशित परदेशी विद्यार्थ्यांसाठी यंदाही दिवाळीसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठाच्या अतिथीगृहात डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमस्थळी परदेशी विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच आकर्षक रांगोळी, छोटे-मोठे कंदील लावून सजावट करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी परिसरात पणत्या प्रज्वलित करून प्रकाशाच्या या सोहळ्यास प्रारंभ केला.कार्यक्रमात इंटरनॅशनल अफेअर्स कक्षाचे संचालक डॉ. एस.बी.सादळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमास परदेशी विद्यार्थ्यांचे संशोधन मार्गदर्शक, अधिविभाग प्रमुख, टास्क फोर्स समिती सदस्य उपस्थित होते.



दिवाळी अंक योजनेच्या शुभारंभप्रसंगी दिपक कोळी, सौ.सुषमा दातार, माया कुलकर्णी व अन्य मान्यवर.

2 4 OCT 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करदात्यांच्या रकमेचा विनियोग योग्य करा

## प्र-कुलगुरू टी. पी. अजयकुमार; स्तुती प्रशिक्षणाचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३: करदात्यांच्या रकमेचा विनियोगपूर्वक वापर करावा, असे आवाहन प्र-कुलगुरू टी. पी. अजयकुमार यांनी केले.

केरळ विद्यापीठात आयोजित स्तुती प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय प्रायोजित स्तुती (सिनरजिस्टिक ट्रेनिंग प्रोग्रॅम अँड टेक्नॉलॉजिकल इन्फ्रास्ट्रक्चर) योजनेअंतर्गत केरळ विद्यापीठाच्या केंद्रीय प्रयोगशाळा आणि शिवाजी विद्यापीठातर्फे त्याचे आयोजन केले होते.

प्रा. जी. एम. नायर यांनी आठवडाभराच्या कार्यक्रमाचा आढावा घेत भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय व विद्यापीठाने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. केरळ विद्यापीठाला नॅकची अ ++ ग्रेड मिळण्यामध्ये सीएलआयएफ केंद्राचा खूप मोठा हातभार आहे, असेही नमूद केले. केंद्राचे संयुक्त संचालक डॉ. जी. सुबोध यांनी सर्व सहभागी तसेच केरळ विद्यापीठातील प्राध्यापकांच्या सहभागाबद्दल कौतुक केले.

स्तुतीचे स्थानिक समन्वयक प्रा. सॅम सालोमन यांनी सहभागी व्यक्तींची मर्यादा जरी ३० असली तरीही केरळमधील ४० आणि केरळ बाहेरचे ४० संशोधक विद्यार्थ्यांना कार्यक्रमांत सहभागी करून घेतल्याचे सांगितले. सिंडिकेट सदस्य के. जी. गोपचंद्रन, स्तुतीचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते.



कोल्हापूर : केरळ विद्यापीठात स्तुती प्रशिक्षण समारोपप्रसंगी प्र कुलगुरू टी. पी. अजयकुमार, प्रा. सॅम सालोमन, प्रा. जी. एम. नायर, के. जी. गोपीचंद्र, डॉ. जी. सुबोध व प्रा. आर. जी. सोनकवडे.

तरुण भारत

# विधी अभ्यासक्रमामध्ये आता ३५ ला पास

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विधी विभागाच्या सर्वच अभ्यासक्रमाला ३५ टक्के गुणांना उत्तीर्ण करण्यास विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. अध्यक्षपदी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. त्यामुळे यामध्ये १००/८०/ २० व ७०/३० पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना ३५ गुणांना पास होण्याचा मार्ग रिकामा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची दखल घेऊन विद्यापीठ प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे. या निर्णयामुळे अनुत्तीर्ण झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे विधी विभागाच्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाच्या निर्णयाचे स्वागत होत आहे.

पुढारी

## संक्षिप्त

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची बी.ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस १ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध आहे. http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालय व मुक्त विद्यापीठामध्ये प्रवेशित आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचाही लाभ मिळणार आहे. विद्यापीठ मुख्य कार्यालय, नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.